# जिल्हा व सत्र न्यायालय
# नांदेड — ४३१ ६०१

E-mail : mahnandc@mhstate.nic.in
Telephone No. : 02462 - 234555, 244683. Fax No. : 02462-244682

## निविदा सुचना

याद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालयास 12 V/ 7 AMP यूपीएस करीता **बॅटरी** Excide/Amron कंपनीचे १०४ नग खरेदी करावयाचे प्रस्तावित आहे.

त्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडून 12 V / 7 AMP यूपीएस साठी **बॅटरी** सर्व करांसहित प्रति नग दर, बॅटरी कंपनीचे नाव व गॅरंटी—वॉरंटी इत्यादीचा समावेश असलेली सीलबंद निविदा या कार्यालयास **दिनांक : १६ फेब्रुवारी २०२४** रोजीपर्यंत किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत पोहचतील या बेताने पाठविण्यात यावेत. निविदेमध्ये मागणी केलेले १०४ नग 12 V / 7 AMP यूपीएसची **बॅटरी** त्वरित व उधारीवर पुरवठा करण्याची तयारी पुरवठादाराची असावी, कोषागारातून देयक पारित झाल्यावर पुरवठादारास देयकाची रक्कम प्रदान करण्यात येईल.

सीलबंद लिफाफा **"मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड"** यांचे नावे **" 12 V / 7 AMP यूपीएस साठी बॅटरी पुरवठा निविदा"** असे ठळक अक्षरात लिहुन द्यावे.

### निविदा खालील अटींवर मंजूर करण्यात येईल.

- मागणी केलेल्या 12 V / 7 AMP यूपीएस साठी बॅटरी एकुण १०४ नग पुरवठा जिल्हा न्यायालयात करण्याची व्यवस्था पुरवठादाराकडे राहिल. त्यासाठी वाहतूक, हमाली किंवा इतर कोणतेही खर्च/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.
- पुरवठा करण्यात आलेला 12 V / 7 AMP Excide/Amron कंपनीचे यूपीएस बॅटरी मागणीनुसार असल्याची खातरजमा झाल्यानंतरच आपले उधारी देयक उपलब्ध अनुदानानुसार तसेच, कोषागारातून देयक पारित झाल्यानंतर पुरवठादारास कार्यालयीन कामकाजानुसार ऑनलाईन रक्कम/धनादेश अदा करण्यात येईल.
- निविदा मंजूर झाल्यानंतर यूपीएस बॅटरी हया जिल्हा न्यायालयातील सर्व यूपीएस मध्ये बसवून द्यावे लागतील त्या करीता कुठलेही अतिरीक्त शुक्ल दिले जाणार नाही.
- प्राप्त निविदा मंजूर अथवा रद्द करण्याचे संपुर्णत: अधिकार या न्यायालयास राहतील.
- निवीदा दाखल करणाऱ्या पुरवठादाराकडे GST/सेल्स टॅक्स नंबर असणे आवश्यक आहे.
- देयक अदा केल्यानंतर देयकाची पावती सादर करावी लागेल.
- सदरहू निवीदेमध्ये कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय बदल, दुरूस्ती किंवा सुधारणा करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
- सदरहू करण्यात आलेला दरकरार/निवीदा कोणत्याही क्षणी कोणत्याही

कारणाशिवाय मंजूर अथवा रद्द करण्याचा संपूर्णतः अधिकार हा या कार्यालयाचा राहील.

- निविदेबाबतच्या विवादासाठी न्यायिक क्षेत्र नांदेड असेल.
- तसेच निविदाधारकाची निविदा मंजूरीनंतरही प्रत्यक्ष खरेदी करतेवेळी शासनाच्या GeM Portal वरील दर पाहून GeM वरील दर कमी असल्यास GeM Portal वरुन खरेदी करण्याचे स्वातंत्र्य या कार्यालयास राहिल.

आदेशावरुन,

09-02-2024

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नांदेड

जिल्हा न्यायालय, नांदेड }
दिनांक : ०९ फेब्रुवारी २०२४ }

जावक क्रमांक/वित्त विभाग/लेसा/ 1632 /२०२४

प्रति,
अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांना सदरहू निवीदा नोटीस अग्रेषीत करण्यात येवून कळविण्यात येते की, त्याची एक प्रत बेलीफामार्फत खालील ठिकाणी देवून/चिकटविण्यात येवून मुळ गोषवारा लवकर या न्यायालयास परत करण्यात यावा.

०१) जिल्हा न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०२) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०३) मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०४) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०५) जिल्हा परिषद, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०६) नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड यांचे नोटीस बोर्ड

आदेशावरुन,

09-02-2024

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नांदेड

जिल्हा न्यायालय, नांदेड }
दिनांक : ०९ फेब्रुवारी २०२४ }